जनमानसाची शिदोरी




– मुजफ्फर हुसेन
कार्याध्यक्ष,
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

# भाजपाने आता भाषावाद सुरु केला



संविधानाचे लेखन करत असताना हिंदी भाषेला राष्ट्रीय भाषा करण्याचा मुद्दा चर्चेत आला त्यावेळी या समितीतील तज्ज्ञांनी आपापली मते मांडली आणि शेवटी असे ठरले की भारत हा विविध भाषांचा देश आहे, विविध जाती, धर्माचा देश आहे, खूप मोठी संस्कृती या देशाला लाभलेली आहे, त्यावेळी साक्षरतेचे प्रमाणही कमी होते.... अशावेळी हिंदी राष्ट्रभाषा केली तर गुजरात राजस्थान, तेलुगु, तमिळ, ईशान्यकडील राज्यात शिक्षणाचा प्रश्न उद्भवेल म्हणून मातृभाषेतून शिक्षण द्यावे असा विचार पुढे आला. घटनेने प्रत्येक प्रांताला त्यांची भाषा बोलण्याचा अधिकार दिला आहे. मी गोरेगावच्या दक्षिण भारतीय शिक्षण संस्थेत शिकलो पण आम्हांला हिंदी, मराठी, इंग्रजी शिकण्याचा पर्याय होता आणि मी मराठी निवडले....ज्यांना मल्ल्याळी किंवा तमिळ शिकायचे त्यांच्यासाठी तशी सोय होती. राम मंदिराचा मुद्दा आता संपलेला आहे त्यामुळे भाजपाने जातीवाद, प्रांतवाद व भाषावाद सुरु केला आहे. काँग्रेस सरकारने ७० वर्षात निर्माण केलेली देशाची संपत्ती विकली जात असताना तसेच जनतेचे मुलभूत प्रश्नावरून लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी भाषावाद सारखे मुद्दे उकरून काढले जात आहेत. या भागात इतर राज्यातून लोक आले व महाराष्ट्राने त्यांना आपले करून घेतले कोणालाही जात, धर्म भाषेवरून वेगळी वागणूक दिली नाही. पण भाजपाने जाणीवपूर्वक भाषा वाद सुरु केला आहे त्यामागे राजकीय स्वार्थ आहे...

जय हिंद...